## चित्रकाराचा फलक आणि कोराच राहिला

एक होते झाड मोठे डेरेदार घेरेदार
तिथे होती वसतीला चिमुकली एक खार.
खेळण्यात नाचण्यात असायची सदा दंग
अंग कोवळे कोवळे गर्द भुरा भुरा रंग.
एक होता चित्रकार चित्रे काढी मनोहर
लेकरांची पाखरांची माया त्याला अनिवार.
होती पशूंची पक्ष्यांची समजत त्याला बोली
कुणीतरी साधूने ही विद्या होती त्याला दिली.
डेरेदार झाडापाशी आला फिरत फिरत
होता फलक काखेत आणि कुंचला हातात.
बगलेत होती त्याच्या चिमुकली एक झोळी
होती 'जम्मत गम्मत' तिच्यामध्ये भरलेली.
कोण कुठला हा आला आहे पारधी शिकारी?
खारुबाईंना वाटली जगावेगळी ही स्वारी.
मागे पुढे, खाली वर, भराभरा, तरातरा
खारुबाईंच्या सारख्या सुरु झाल्या येरझारा.
तालामध्ये हाले डोले उभी साजिरी शेपटी
खारुबाईंची धावरी मूर्ती सुबक गोमटी.
चिमुकले दोन हिरे तसे लाल लाल डोळे
धगधगते निखारे उजळले इवलाले.
खारुबाईंना पाहून चित्रकार आनंदला
आणि घेतला तयाने हाती सुबक कुंचला.
तेवढ्यात खारुबाई पळाल्या की शेंड्यावर
चित्रकाराच्या कौतुके हासू आले ओठावर.
'नाही धोका नाही घात प्राणी दिसतो हा भला'
चिमुकल्या खारीच्या त्या विचार हा मनी आला.

## चित्रकाराचा फलक आणि कोराच राहिला

पुन्हा पातली नाचत
ठुमकत मुरडत
दोन इंगळ डोळ्यांचे
होते पहात बोलत.
केला चीत्कार आनंदे
चिर चिर चिर चिर
चित्रकाराच्या हर्षाला
उरला न पारावर.
खार होती ती म्हणत
"अहो थोर महाशय
बगलेच्या पिशवीत
भरलेले आहे काय?
चारा चुरा मुठभर
तुमच्या त्या थैलीतला
येऊ द्या की थोडा तरी
गरीबाच्या वाटणीला."
असे म्हणून घेतली
तिने गिरकी फिरून
चित्रकाराने घेतली
मूठ हळूच भरून.
मुठीतला 'चिऊचारा'
त्याने फेकिला समोर
खाऊ घेऊन क्षणात
झाली चंचला पसार.
आणि पातली ती पुन्हा
नाचवीत शेपटीला
हेतू जाहला सफल
घास आणखी मिळाला.
"खारीबाई खारीबाई
का गं पळतेस दूर?
भिऊ नको भरवसा
ठेव गडे माझ्यावर."
चित्रकार म्हणे तिला
आर्जवाने आळवीत
"पाखरांचा लेकरांचा
मायाळू मी खरा मित्र."
पुन्हा करीत चीत्कार
मागे गेली पुढे आली
इजा बिजा आणि तिजा
भेट खाऊची मिळाली.
क्षणभर राही स्थिर
रोखुनिया लाल डोळे
झळाळते दोन हिरे
अग्निकण इवलाले.
एकसारखा जाहला
सुरु खारीचा चीत्कार
चित्रकाराला कळला
तिच्या मनीचा विचार :
'दिला खावयास खाऊ
आणि वाटला प्रेमळ
तरी माणूस प्राण्याच्या
जाऊ नयेच जवळ,

## चित्रकाराचा फलक आणि कोराच राहिला

कधी करेल शिकार
नेम नाही माणसाचा
माणसाशी करा मैत्री
रानातल्या पशु पक्ष्या
मुक्या जीवाचे ते बोल
आणि नकळत त्याच्या
आणि करीत चीत्कार
पुन्हा पळाली नाचरी
होता कधीच गळाला
चित्रकाराचा फलक

कधी घेईल तो प्राण
कारण तो 'बुद्धिमान'
चार पाऊले दुरून
'स्वतंत्रता' जीवप्राण!'
चित्रकाराने ऐकले
डोळ्यांमध्ये अश्रू आले.
चिर चिर चिर चिर
उंच झाडावर खार.
हातामधला कुंचला
आणि कोराच राहिला!!

**आवडता खाऊ**

शाळेतल्या चिमण्यांना वाढदिवसाची भेट
कुणीतरी पाठवली मिठाईची लयलूट.
कुणा आवडले लाडू, कुणा श्रीखंड बासुंदी
कुणि घेतली जिलेबी, कुणि खाई पेढे कंदी.

दूर एका कोपऱ्यात एक होते गोड फूल
मुल नव्हे तत्वज्ञ तो विचारात होता चूर.
"सांग तुला काय देऊ, रसगुल्ले, बर्फी, पेढे?
म्हणे बाळ गंभीर ते, "मला नाही ते आवडे!"
"पाहिजे ते माग तुला, नको खिन्न असा राहू,
सांग बाळा, कोणता रे तुझा आवडता खाऊ."

उंच निळ्या आभाळात, टक लावुनी पहात
दिले उत्तर बाळाने, झाले गुरुजी स्तिमित.

"काळ्या पेटीत ढगांच्या, ठेविलेला साठवून
पावसाच्या संगे खाली, देव देतो पाठवून
गारा येती भुईवर, थडा थडा सडा सडा
अमृताचा एक एक जणु सांडतो तुकडा
आवडतो सदा मला खाऊ एकच तेवढा
देवाच्या त्या खाऊपुढे, फिका लाडू, फिका पेढा!!"

## असे रंगवा आयुष्य

पायाखाली म्हणे भूमी "जगा नाही काही कमी"
निळे निर्मळ आकाश, आम्हा शिकवी विकास.
आरवते ही पहाट, "पुढे बघा , जगा नीट"
म्हणे सूर्यनारायण, "तुम्ही माझेच किरण!"

हेच खगांचे सांगणे, "गाणे म्हणजे जगणे."
वदे वाहणारा वारा, "फिरा, उपकार करा."
देती सुमने संदेशा, "आनंदाने हसा हसा."
गवताची लव लव मनी ठसवी मार्दव.

नदी निर्झर प्रार्थिती, "वहा, रहा शुद्धमती."
वृक्ष साक्ष हीच देती, "फळे असावी गोमटी."
उसासते ही दुपार, "सुख कष्टात अपार."
कुजबुजे सायंकाळ, "उगा नको धावपळ."

खुणाविती ग्रहतारे, "फेर धरा, नाचा सारे."
मंत्र सांगे निशानाथ, "प्रेम अमृत अमृत."
देतो इशारा अंधार, "गर्वा, घर खाली कर."
गर्जतात मेघपंक्ती, "दया माया ठेवा पोटी."
बोले इंद्राचे धनुष्य, "असे रंगवा आयुष्य!"

## नवरत्न दरबार

'अकबर' राजा थोर त्याचा नवरत्नांचा दरबार.

'बिरबल' त्याचा हुशार मंत्री, लढवी युक्ती सांगे गोष्टी,
कविता सुंदर लिही, बुद्धीला ठाऊक नव्हती हार!

'तानसेन' करी मंजुळ गायन, बादशहाचे करी मनरंजन
गायन नोहे, वाहे जणु की स्वर्गसुखाची धार.

'मानसिंह' तो सिंहच दुसरा, गाजे त्याचा धाक दरारा
हत्ती, घोडे, नरवीरांचा प्रचंड तो दळभार.

'बदाउनी' तो सुप्रसिद्ध लेखक अनुवादी तो ग्रंथ अमोलिक
'भारत', 'श्री रामायण' ज्यांच्या माधुरीस नच पार.

'अकबरनामा', 'ऐनेअकबरी' रचना यांची 'अबुल फझल' करी
बादशाहाच्या थोरपणाचा करितो जयजयकार.

'फैजी' होता नामी शाहीर, 'हमाम मुल्ला' तसाच 'तोडर'
अनेक ऐसे हिरे तळपती तेजस्वी सरदार.

श्रीरामाची मंगल महती, 'सूरदास' अन् 'तुलसी' गाती
इतिहासामध्ये अकबर राजा कायमचा उरणार.

**शाळा**

ही आमुची शाळा
जननीपेक्षा या आईचा अधिक लागला लळा
ही आमुची शाळा.

त्या आईने अन्न भरविले, या आईने ज्ञान पुरविले
तिने कळीला रूप दिले, मधुगंध हिने अर्पिला,
ही आमुची शाळा.

ऊब तिच्या घरट्यातील प्रेमळ, हिने पाजिले पंखांना बळ
गीत तिने, तर हिने शिकविली उड्डाणाची कला,
ही आमुची शाळा.

ती आई दे भाऊ बहिणी, ही दे जिवलग मित्र मैत्रिणी
अंगण इवले तिचे, इथे तर बाग नभाचा निळा,
ही आमुची शाळा.

शाळेमधल्या बालबालिका, निळ्या नभातील उजळ तारका
सप्तर्षी सद्गुरू शिकविती, मुक्तिमार्ग आगळा
ही आमुची शाळा.

सुखद येथले सरता जीवन, दिशादिशांना जाऊ पांगुन
परंतु राहिल आठवणींचा, कोंभ सदा कोवळा,
ही आमुची शाळा.

**शाळा**

बाळे आमुची पुढे कदाचित, इथेच शिकतिल हासत नाचत
अपुऱ्या अमुच्या आकांक्षांचा अवतारच सानुला,
ही आमुची शाळा.

देश धर्म कुळ या सर्वांहुन, प्रिय आम्हाला ही स्वर्गाहुन
हिची थोरवी कवनी गाता, शब्दच हो पांगळा,
ही आमुची शाळा.

शाळा नच ही पुण्यपंढरी, पिढ्यापिढ्यांनी करणे वारी
शिळेशिळेतुन भरला 'विठ्ठल', 'ज्ञानदेव' सावळा,
ही आमुची शाळा.

## गाई अगं गाई

गाई अगं गाई, साऱ्या जगाची तु आई!

आवडते मला तुझे गोड गोड दूध ताजे
करितसे हम्मा हम्मा, आम्हा पाजीतेस प्रेमा.
तुझे गोजिरे वासरू त्याच्या संगे मैत्री करू
माझ्यातला अर्धा खाऊ तुझ्या बाळाला मी देऊ?

दावे बांधती गळ्यात तुला ठेविती गोठ्यात
मला नाही आवडत मोठया माणसांची रीत.
तुझ्या शेजारी रहाया उद्यापासून मी येऊ?

तुझा जाड जाड चारा अय्या! मी गं कसा खाऊ?
तूच ये की गं घरात, रहा माझ्याच खोलीत
रोज करू या आपण छान अंगत पंगत!

## पेशवे उद्यान

बघ आई आभाळात बाळे ढगांची धावती
रंगीबेरंगी पोशाख कसे त्यांचे लकाकती.

आई, सहल तयांची चंद्रावर का गं जाते?
आगगाडी आभाळात कुठे कशी गं धावते?

उंची पोशाख करुन कोण जातो सहलीला?
फौज यांची चालली ही कुठेतरी फिरायला.

जिथे निघाली नटून मेघ बाळे ही लहान
आभाळीही आहे का गं एक 'पेशवे उद्यान?'

## अंगाई गीत

घरट्यात माउलीला म्हणे चिमणुल्याची स्वारी
"झुंजुमुंजु झाले आई, उंच घेऊ दे भरारी!"

"पंख अजुनी कोवळे, बाळा करू नको घाई
माझ्या मायेच्या उबेत शांत करी रे अंगाई!"

केली अंगाई बाळाने, नीट घेतला विसावा
मग जाग येता उंच, उडे गरुडाचा छावा.

जाग येता पाळण्यात, म्हणे माउलीला सोने
"बघ उधळीले कोणी आभाळात खूप सोने.

घालु नको पांघरूण, मला उठू दे लौकर
चिऊ काऊ बोलाविती खेळायास उंचावर."

"करू नको अशी घाई, कोवळी तु जाई जुई
गाणे म्हणते बाळाला, शांत करी रे अंगाई."

बाळ चांगुणे शहाणे, पाळण्यात झोपी गेले
राजहंसाचे लेकरू जाग येताच उडाले!

## नाविका पल्याड ने रे मला !

**मुलगी :**
"बघ दिवस बुडू लागला
नाविका, पल्याड ने रे मला."

**नाविक :**
"दे मोल मला रोकडे
नेईन तुला पलिकडे
मी क्षणात लंघुनि जला
पंखावर नेईन फुला !"

**मुलगी :**
"कमळाची फुलली दले
बघ डोळे माझे निळे
चंद्राची चवथी कला
जग सगळे म्हणते मला."

**नाविक :**
काळे की डोळे निळे
ते मला न काही कळे
दे दाम रोकडा भला
मी पल्याड नेईन तुला."

मिळताच मोल रोकडे
चालली नाव पलिकडे
अंधारही म्हणू लागला
"चल, पल्याड घेउनी मला."

**वारा वाहतो वाहतो**

वारा वाहतो वाहतो, वारा दिसेना दिसेना
पुसा ओळख वाऱ्याची सळसळत्या पानांना.
गातो गोड गोड गाणी, गोष्टी सांगतो कानात
फुलांसंगे पानांसंगे वारा खिदळे रानात

कधी वाऱ्याची पालखी येते डुलत डुलत
कधी येतो धडाधडा रथ रागात वेगात
भूमीवर लोळणारी डेरेदार दाट दाट
आकाशाशी खेळणारी उंच उंच ताठ ताठ
झाडे झुकविती माथा वाऱ्यापुढे वाकतात.

वारा वाहतो वाहतो वारा दिसेना दिसेना
वारा वाहिल्यावाचून सृष्टी हलेना, हासेना!